# परीस स्पर्श

मधुबन् ले आऊट मध्ये श्री महालक्ष्मी मंदीर झाल्याची चर्चा सर्वदूर पसरली होती. जे जे भाविक श्री महालक्ष्मी मातेचे दर्शन घेऊन आले ते तर तारीफ करतांना थकतच नव्हते. रेल्वे क्रॉसिंगच्या थोडे आतमध्ये नवीन वसाहतीत हे मंदीर उभारले होते. सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांच्या सक्रीय कार्याचे हे देऊळ म्हणून प्रतिक होते. चार वर्षांपूर्वी पासूनच्या देवळाच्या बांधकामाच्या आराखड्यास सुरवात झाली होती. आणि आज प्रत्यक्षात हे सुंदर शिल्प उभारण्या गेले. श्री देवी मातेची सुबक मूर्ती जयपूरहून बनवून आणली होती. गाभाऱ्याची सजावट, झाली आणि बघता बघता श्री देवीच्या प्रतिस्थापनेचा मुहूर्त देखिल आला.

अशा या उत्साहाने भारलेल्या वातावरणात श्री महालक्ष्मी मातेच्या पुनर्स्थापनेचा सोहळा प्रसिद्ध वेदशास्त्रसंपन्न श्री महादेव शास्त्री कुलकर्णी बुआंच्या हस्ते विधीवत संपन्न झाला. बुआंच्या सोबत आणखि पाच गुरुजी मदतीस होते. सुंदर सुबक आणि अप्रतिम सोहळा उपस्थितांनी डोळे भरून पाहिला. पुढचे ८ दिवस भजन, कीर्तन, भंडारा, इ. कार्यक्रम शिस्तीत होत होते. बाहेर-गांवावरूनही मोठमोठे कीर्तनकार, प्रवचनकार हजेरी लावू लागले. उद्या श्री महादेव शास्त्री श्री महालक्ष्मी मातेचा आणि त्या सोसायटीचा निरोप घेणार होते. सगळं मनासारखं झाल्यामुळे तेथील रहीवासी-सभासद निवांतपणे बुआंशी बोलण्यासाठी जमले होते.

सोसायटीचे सेक्रेटरी म्हणाले 'गुरुजी, तुम्ही एवढे प्रगाढ-विद्वान पंडीत म्हणून नावारूपाला आले, तेव्हा त्यासाठी लहानपणापासून तुम्ही या अभ्यासाकडे वळलात का ?? कोणत्या गुरुकुलात राहून तुमचं अध्ययन-अध्यापन झालं ?? त्यावर महादेव शास्त्री हसून म्हणाले, मी माझी जीवन कहाणीच तुम्हाला सांगतो. म्हणजे तुमच्या सगळं लक्षात येईल !! ऐका तर का आता श्रोतेहो -

माझं गाव कोकणातील गुहागर जवळ आहे. वडील शाळा मास्तर; आई गृहिणी आणि आम्ही चार भावंडे आहोत. दिनकर, प्रभाकर, विष्णू आणि मी सर्वात धाकटा - महादेव !! माझे तिनही भाऊ बुद्धीने हुशार होते. ते दरवर्षी चांगला अभ्यास करून पुढच्या इयत्तेत शिकत होते. पण माझं अभ्यासात लक्ष नव्हतं. गुरुजींनी

शिकवलेलं लक्षातही राहत नव्हतं. खुद्द बाबांनी माझ्यासाठी खूप प्रयत्न केले. पण माझ्यात काहीच प्रगती होत नव्हती. कंटाळून बाबांनी मला शाळेतून काढून टाकलं. आणि गावातील गायींना चरण्यासाठी जंगलात नेणाऱ्या गुराख्यासोबत मागपण पाठवायचे. सकाळी मी त्या गणुकाकांसोबत जायचो ते एकदम संध्याकाळी अंधार पडल्यावरच घरी परत यायचो. अंधारात रस्ता दिसावा म्हणून आमच्याकडे अडगळीच्या खोलीत एक बिजेरी (टॉर्च) होती. तिला खटपट करून दुरुस्त केली, आणि सेल टाकल्यावर ती सुरू झाली. मी रोज ती बिजेरी वापरू लागलो.

आमच्या घराजवळ निमगावकर काकांचा मोठा वाडा होता. त्यांचं किराणा दुकान, दुधाची डेअरी आणि हॉटेल असा मोठा व्यवसाय होता. शेजारी म्हणून त्यांच्याकडे आमचं जाणं येणं होतं. त्यांचा मुलगा गोपाल हा गावातील गुंड मुलांसोबत चकाट्या पिटत असे. मला रस्त्याने जातायेतांना दगड मारून, टर उडवून त्रास द्यायचे. मी बाबांना सांगायचो पण ते म्हणायचे; तू लक्ष देत जाऊ नको. आपलं गुरं राखण्याचं काम सचोटीने कर. काही दिवसांनी त्यांचे त्रास देण्याचे प्रमाण वाढले. रस्त्यात मुद्दाम काटे-काचा टाकून द्यायचे. गायींच्या गळ्यातील घंटाच काढायचे. कधीमधी मारामारी पण करायचे. दुसऱ्या दिवशी सगळ्यांसोबत काहीच घडलं नाही असं वागायचे. त्यामुळे त्यांच्यावर कोणालाही शंका यायची नाही की ते मला त्रास द्यायचे म्हणून -

एके दिवशी रविवारी सकाळी श्री निमगावकर काका आमच्या घरी आले. आणि बाबांना म्हणाले की, तुमच्या महादेवाने आमच्या घरची बिजेरी (टॉर्च) चोरली. बाबांना खरंच वाटेना! ते म्हणाले, महादेव मठ्ठ आहे पण तो चोरी करू शकत नाही. यावर त्यांनी अद्वातद्वा बोलून माझ्याजवळ असलेली बिजेरी त्यांचीच आहे असे ओरडून सांगू लागले. आजूबाजूचे लोक काय झाले ते बघण्यासाठी जमले. बाबांनी सगळ्यांसमोर मला मारले. माझं ऐकूनही घेतलं नाही. आईला सांगितलं की, याला सतरंजी, कपडे देऊन घराबाहेर जायला सांग. बिचारी आई, रडत रडत माझं सामान बांधू लागली. आणि खरंच बाबांनी हात धरून मला घराबाहेर काढलं!!

मला तर काहीच सुचेना; १२।१३ वर्षांचं वय - कसंतरी सामान हातात घेऊन

मी रडत रडत वाट फुटेल तिकडे जाऊ लागलो. जंगलाच्या दिशेने जात असतांना माझे नानाकाका मला भेटले. त्यांनी कुठे चाललास पुढे ?? असे विचारताच मी त्यांना घडलेली सगळी हकीकत सांगितली. नानाकाकांना बाबांचा राग आला म्हणाले, चल घरी, बघतोच मी तुला कसा घरात घेत नाही ते !! आणि त्यांनी मला घरी परत नेले.

अंगणातूनच बाबांना मोठमोठ्याने आवाज देवून मोठ्या भावाच्या हक्काने खूप बोलले. या लहान लेकराला घरातून बाहेर काढलं म्हणजे मोठा न्याय केलास का तू ?? खरं खोटं तपासून न पाहता त्या निष्पाप जीवाला उगीचच पोरकं केलस तू. त्याने खरंच चोरी केली नाही हे मी सिध्द करून दाखवतो. चार लोक बोलले म्हणजे ते बरोबरच आहे असे होत नाही आणि सरतेशेवटी मला घरात प्रवेश मिळाला. त्यानंतर माझे जीवनच बदलले !!

गावातील देवीची जत्रा जवळ आली होती. महीनाभर तराणेकर बुवांचे किर्तन असायचे. बाबांनी महाराजांना सांगितले की, हा माझा मुलगा महादेव, त्याला तुमच्याकडे सोपवतो - तुम्ही गावोगावी जाता तेव्हा हा तुमची सेवा करेल. तुमच्या पायाशी त्याला जागा द्या. आता तुम्हीच त्याचे तारणहार !! मलाही त्यांच्या सहवासात आनंद मिळू लागला. बुवा दरवर्षी आले की त्यांचा मुक्काम गावातील पाटलांच्या घरी असे. पण बाबांनी सांगितले की, पुढच्या वर्षीपासून तुम्ही आमच्या घरी तुमच्या शिष्यांसह राहायचे !! मला मग त्यांच्या बोलण्याची, ज्ञानाची, कीर्तन सांगण्याच्या शैलीची ओढ लागली कसं ते मलाही कळले नाही. त्यांचे अभंग मला मुखपाठ होवू लागले. मी कीर्तनात त्यांना साथ पण देवू लागलो, सगळ्यांना माझी प्रगती बघून आनंद होवू लागला. मी पण त्यांच्या सोबत वेगवेगळ्या गावातील मंदिरात यात्रेच्या वेळी जावू लागलो. बुवांवर माझी खूप भक्ती होती. ते प्रेमाने मला पुराण, ग्रंथ, संदर्भासहित शिकवू लागले. गुरुंना माझी आवड दिसून नोकरीला पण लागलो होतो. तराणेकर महाराजांचा आवडता शिष्य म्हणून लोक मला ओळखू लागले. स्वतंत्रपणे पूजापाठ करण्याचा अधिकार सुध्दा बुवांनी मला दिला. अशा रीतीने गावोगावी माझ्या अध्ययनाच्या शिदोरीवर माझा नावलौकिक वाढला. यज्ञ, लघुरुद्र, भागवत, देवादिकांच्या

Page No. (४)
Date:

मुर्तीची प्रतिस्थापना करणे यासारखे महत्वाचे कार्य मी सहजपणे करू लागलो. प्रतिष्ठीत विद्वान पंडीतांमध्ये माझी गणना होऊ लागली. माझा उत्कर्ष बघून बाबांना धन्य धन्य वाटले. माझ्या भक्तांना माझा सार्थ अभिमान वाटू लागला. गावातही मला मानाने बोलावणे येऊ लागले.

लहानपणी भुकेचे कष्ट सोसले, अपमान सहन केला ते सगळं काळाच्या आणि आठवणींच्या पडद्याआड झालेल्या गोष्टी. फक्त नानाकाकांना मात्र मी कधीच विसरू शकलो नाही. त्यांनी मला घरी परत आणले नसते तर ?? मी मठात राहायचो पण यावरून पुढचा घरी जायचो. आईबाबा थकले होते. भावांचे लग्न होऊन ते नोकरीनिमित्ताने बाहेरगावी राहू लागले. आईची इच्छा होती की मी पण गृहस्थाश्रमात राहून परमार्थ करावा. बाबा बुवांशी बोलले. त्यांनी आनंदाने परवानगी दिली एवढेच नव्हे तर त्यांच्या परीचयतील कुटुंबातील रमाशी माझा विवाह करून दिला. आता माझा संसार सुरू झाल्यामुळे मी बिदागीचा काही हिस्सा मठात देऊन बाकीचा चरीतार्थासाठी वापरू लागलो. आई बाबांचा आशीर्वाद, तराणेकर बुवांची कृपाप्रसादाने मला संतती - संपत्ती भरपूर प्रमाणात मिळाली. बुवांनी तर मठाचा उत्तराधिकारी म्हणून माझी निवड केली. यापेक्षा मला तरी जीवनात आणखि काय हवे होते ??

महादेव शास्त्रीची जीवनकहाणी ऐकून सगळेच भारावून गेले. ११ वर्षेवर संतसहवास मिळाल्यामुळे खरोखरच त्यांच्या आयुष्याला परीस स्पर्श झाला होता.!!

शब्दांकन :- सौ विजया जोशी. श्री विष्णू रामचंद्र उपाध्ये



